सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ६१] शुक्रवार, जानेवारी २०, २०१२/पौष ३०, शके १९३३ [पृष्ठे ३

किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक ७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४००० ३२, दिनांक १६ जानेवारी २०१२

### अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केमाअ २००९/प्र.क्र. ३९८/०९/सहा. - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या २७ कलम, पोट-कलमे (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

१. या नियमांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ याच्या नियम ३ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :-

``३ क. एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधित असणे.- अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे दीडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील :

परंतु, एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित विनंती अर्ज केला असेल अशा प्रकरणी, जन माहिती अधिकारी, केवळ पहिल्या विषयाशी संबंधित विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र विनंती अर्ज करण्याचा सल्ला, अर्जदाराला देईल.``

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नंदकुमार जंत्रे,
शासनाचे सचिव.